# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk16.dte@gmail.com Internet : www.dte.org.in


**अतितात्काळ**
**विधान परिषद तारांकीत प्रश्न**

क्रमांक : १६/आस्था/विपतांप्र/२०११/ ७५
दिनांक : 9 दिसम्बर DEC 2011

प्रति,
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
**मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**

**विषय : विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक : २१९५२**
राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील तांत्रिक सहाय्यकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे जातीवाचक पदनाम बदलून सुधारीत संवर्ग रचना व वेतनश्रेणी मान्य करण्याबाबत.

उपरोक्त विषयांकीत विधानपरिषद तारांकीत प्रश्नाच्या अनुषंगाने शासनास माहिती सादर करण्यासाठी आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील तांत्रिक सहाय्यकारी कर्मचाऱ्यांबाबतची खाली नमूद केलेल्या मुद्यांची माहिती संबंधित संस्थांकडून प्राप्त करुन घेऊन संकलीत स्वरुपात या संचालनालयास सादर करावी.

१. तांत्रिक सहाय्यकारी कर्मचाऱ्यांनी (कर्मशाळा / प्रयोगशाळेतील) त्यांच्या मागण्यासाठी प्रात्यक्षिक घेण्यांचे काम थाबविले आहे काय?
२. तांत्रिक सहाय्यकारी कर्मचाऱ्यांनी (कर्मशाळा / प्रयोगशाळेतील) त्यांच्या मागण्यासाठी प्रात्यक्षिक घेण्यांचे काम थाबविले असल्यास त्याबाबतचा कालावधी.
३. आपल्या विभागांतर्गत कर्मशाळेत व प्रयोगशाळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या.
४. या संचालनालयामार्फत दिनांक १४.१०.२०११ च्या परिपत्रकान्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या निर्धारीत केल्यानंतर त्यानुसार कामकाज न पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या. (नाव व पदनामासह)
५. या संचालनालयामार्फत दिनांक १४.१०.२०११ च्या परिपत्रकान्वये कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार न पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांवर करण्यांत आलेल्या कारवाईबाबतची कागदपत्रे.
६. काहीही कारवाई केली नसल्यास त्याबाबतचा खुलासा.

तरी वर नमूद सर्व मुद्यांची संकलित माहिती **दिनांक १२.१२.२०११ पर्यंत** वर नमूद ई-मेल ॲड्रेसवर मेलद्वारे पाठविण्यांत यावी.

विधानपरिषद प्रश्न
आस्था-३
तात्काळ पाठवावे.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

विधान परिषद तारांकित प्रश्न
अतितात्काळ

पृ.पत्रक्रं.विकाऔ/आ-३/२०११/
दिनांक :- ०९/१२/२०११

प्रति,
प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय,औ.बाद
प्राचार्य,सर्व शासकीय तंत्रनिकेतने,

यांना कळविण्यात येते की,उपरोक्त पत्रात नमूद विधान परिषद तारांकित प्रश्न क्रमांक २१९५२ बाबतची तांत्रिकी सहाय्यकारी कर्मचा-यांबाबतची वरील प्रमाणे नमूद केलेल्या ६ मुदयांची माहिती अतितात्काळ आज दि.९-१२-११ रोजी ५.०० पर्यंत फॅक्स व्दारे या कार्यालयास सादर करण्यात यावी म्हणजे सदर माहिती तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे सुलभ होईल.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद